
दैनिक
# विदर्भ कल्याण
यवतमाळ जिल्हा विशेष
मंगळवार,
१० ऑक्टोंबर २०२३

## वाघाची दहशत : रात्री पिकाला पाणी देणे बंद



**विदर्भ कल्याण / झरी**

तालुक्यात शेती पिकाला पाणी देण्यासाठी रात्री वीज पुरवठा केला जातो. मात्र तालुक्यात वाघाची दहशत असल्याने शेतक-यांनी रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देणे बंद केले आहे. त्यामुळे सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करावा या मागणीसाठी शेतक-यांनी महावितरण कंपनी कार्यालयावर धडक दिली.

तालुक्यातील जामनी दुर्गापुर, मारकी, सालेभट्टी येथील शेतकऱ्यांना शेती करता विद्युत रात्रीला देत आहे. सदर विद्युत लाईन दिवसा मिळण्यात यावी याकरता कार्यकारी अभियंता झरी व तहसीलदार महेश रामगुंडे यांचे कडे परिसरातील शेतकऱ्यांनी निवेदनातून मागणी केली आहे. जामणी, सालेभट्टी, झरी, मारकी परिसरामध्ये शेतकऱ्यांकरिता संध्याकाळी १२:३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत विद्युत देण्याचा वेळ महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने दिला असून त्या वेळेनुसार वीज शेतकऱ्यांना मिळत नाही परिसरात वाघांची दहशत असल्याने शेतकरी वर्ग रात्रीला पिकाला पाणी देणे जात नाही धास्तावला आहे कधी कधी रात्रीच्या वेळेस सुद्धा नियमित लाईन मिळत नसल्याने शेतकरी वर्ग विद्युत लाईन बाबत वैतागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यां करिता सकाळपासून संध्याकाळपर्यंत लाईन मिळण्यात यावी जर आम्हास दिवसा लाईन न मिळाल्यास आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनातून दिला आहे. यावेळी शेतकरी सचिन भोयर, अमोल ठाकरे, बाळू संदलवार, निखिल भोंग, विनोद भोंग, वसंता भोयर, संतोष धांदे, दिलीप भोयर, संतोष वाघाडे, हेमराज रक्तावर, तानबा आगरकर, पांडुरंग सुगंधे, देविदास ठाकरे, बाबाराव भोंग, बाळू ठाकरे, पुरुषोत्तम बुद्धवार, गणेश गुरुवार, गणेश वसाहती, वामन सोनुले, दिलीप शेंडे, राजू कोपेश्वर, गवळी व शेतकरी हजर होते.

### सर्व विदार्थी सुरक्षीत : आश्रमशाळा संचालकाची स्पष्टोक्ती

## भोजनानंतर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

**विदर्भ कल्याण / घाटंजी**

तालुक्यातील घोटी येथील युगनिर्माण आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची अचानक प्रकृती बिघडल्याचा प्रकार आज सकाळी समोर आला. विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. औषधोपचार केल्यानंतर सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर असून त्यांना सुटी देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

घोटी येथील युगनिर्माण आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी सोमवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास शाळेत जेवण केले. त्यानंतर काही वेळातच काही विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटू लागले. हा प्रकार लक्षात येताच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रथम रामपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर त्यांना घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर काही विद्यार्थ्यांना यवतमाळ येथे शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. तर काही विद्यार्थ्यांवर घाटंजी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.

**सर्व विदयार्थी सुरक्षीत**

सत्यसाई बहूउद्देशीय ग्रामीण विकास संस्था, दत्तापूर ता.घाटंजी जि. यवतमाळ व्दारा संचालीत युगनिर्माण वि.जा.भ.ज.प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, घोटी ता.घाटंजी जि. यवतमाळ येथील काही विद्यार्थ्यांना आज सकाळी अस्वस्थ वाटत होते. या दरम्यान आश्रम शाळा प्रशासनाने तातडीने





या विद्यार्थ्यांना रामपूर येथील आरोग्य केन्द्रात दाखल केले. येथून लगेच घाटंजी येथील रुग्णालयात तसेच त्या नंतर यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात रुग्णांची प्रचंड गर्दी असल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांना चांगला उपचार मिळावा याकरीता त्यांना डॉ. भरत राठोड एम.डी. मेडीसीन यांचे खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यामध्ये फक्त दोनच विद्यार्थीनींना मासीक पाळीचा त्रास झाल्याने अस्वस्थ वाटले होते. डॉक्टरांनी इसीजी, ब्लड रीपोर्ट तसेच सर्व तपासणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना कुठलीच विषबाधा झाली नसल्याचे स्पष्ट झाले. विषबाधेची अफवा पसरल्यामुळे पालकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. आता सर्वच विद्यार्थ्यांची प्रकृत्ती चांगली असल्यामुळे त्यांना डीस्चार्ज देण्यात आला तसेच हे सर्व विद्यार्थी आपल्या वसतीगृहाकडे रवाना झाले असल्याची माहिती आश्रमशाळेचे संचालक साहेबराव पवार यांनी दिली आहे.

## केंद्रीय मंत्रालयाद्वारे 'NDPS ACT' च्या अंमलबजावणीसाठी बैठक

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

स्थानिक केमिस्ट भवन मध्ये शहरातील सर्व केमिस्टांसाठी पोलीस प्रशासना तर्फे अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी केंद्र सरकारसाठी अत्यंत संवेदनशील असणाऱ्या"NDPS Act" म्हणजेच Narcotics drug & Psychotropic Substances Act अंतर्गत येणाऱ्या औषधांची विक्री व त्यांचा मिस युज कशाप्रकारे समाजामध्ये होऊ शकतो. या संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दिवसें दिवस तरुणांमध्ये त्याचा विशेष प्रभाव पडून, ते नशेच्या आहारी जाऊन विविध प्रकारचे संगीत गुन्हे जसे की लूटमार, हत्या करीत आहे. म्हणूनच एकंदरीत फार्मासिस्टनची जबाबदारी यामध्ये वाढलेली आहे. त्यांनी याचे भान ठेवून योग्य डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय ही औषधे विक्री करू नयेत व विकलेल्या औषधांची योग्य रीतीने नोंद ठेवणे बंधनकारक आहे असे नमूद केले. NDPS कायद्याचे उल्लंघन झाल्यास केंद्र सरकारकडून सक्त कारवाईचे आदेश पोलिसांना देण्यात आल्याचे अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप यांनी सांगितले. NDPS कायद्यामध्ये नेमकी कुठली औषधी आहेत, त्याचा मिस युज कशा प्रकारे होऊ शकतो,




ही औषधी विकताना कुठली काळजी घ्यायची याबद्दलची सविस्तर माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर यांनी दिली. यावेळी मंचावर अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर, MSCDA च्या सदस्य पदी निवड झालेल्या श्री. संजय पिंपळखुटे यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी AIOCDA चे सदस्य रमणजी अग्रवाल, औषधी निरीक्षक सविता दातीर, जिल्हा अध्यक्ष पंकज नानवाणी, सचिव संजय बुरले, कोषाध्यक्ष गजानन बट्टावार, शहर अध्यक्ष श्रीकांत खडककर, सचिव प्रसाद चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सचिव प्रसाद चौधरी यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष पंकज नानवाणी यांनी केले. करून जिल्ह्यातील सर्व केमिस्टांची हमी घेतली व असे कुठलेही प्रकार आपल्या सदस्यांकडून भविष्यात होणार नाही याची ग्वाही दिली.अशी माहिती जिल्हा माहिती अधिकारी अविनाश फरकुंडे यांनी दिली.

## संत्रा उत्पादकांची कलगाव येथे शेतीशाळा

**विदर्भ कल्याण / दिग्रस**

तालुक्यातील कलगाव येथे कृषी विभाग आत्मा वतीने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांन करीता लिंबुवर्गीय फळपिक व संत्रा पिक व्यवस्थापन या विषयावर फारूक अहमद यांच्या संत्रा बागेमध्ये शेतीशाळा वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या शेतीशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. मयुर इंगोले - शास्त्रज्ञ उद्यानविद्या विभाग कृषी विज्ञान केंद्र संघवी रे. दारव्हा हे प्रामुख्याने उपस्थित होते.

संत्रा शेतीशाळेला कलगाव परीसरतील प्रगतशील शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांशी संवाद साधत संत्रा पिक एकात्मिक खत व पाणी व्यवस्थापन, फलांची गुणवत्ता व मूल्यवर्धन होण्या करीता घ्यावयाच्या उपाय योजना चर्चा केली. तसेच शेतकऱ्यांनी एकत्र येवून कृषी व संलग्न विभागाच्या विविध योजनांमध्ये सहभाग नोंदवून संत्र्याचे मूल्यवर्धन होण्या करीता प्रयत्न करावे. या करीता फल तोडणीपूर्वी घ्यावयाची काळजी तोडणीसाठी मापदंड, फळांची हाताळणी, विक्रीपूर्व प्रक्रिया फळांची प्रतवारी, बुरशीनाशक व मेणाची प्रक्रिया, फळांची बांधणी (पॅकिंग) साठवण या बाबत मार्गदर्शन केले. तसेच शकतेनुसार फळांची गुणवत्ता सुधारने व उत्पादन वाढीसाठी दर महिन्याला वेळोवेळी शेतीशाळा वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी शेतकरी गट शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या माध्यमातून प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, एकात्मिक फलोत्पादन अभियान या योजनेचा संत्रा उत्पादकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. सदर शेतीशालेला गावातील संत्रा उत्पादक प्रगतिशील शेतकरी रामेश्वर राऊत, फारुक अहमद पत्रकार कृषी विभागाचे मंडळ कृषि अधिकारी, किरण शिंदे, आत्माचे सागर बोंडे, कृषी पर्यवेक्षक एस. के. चव्हाण, कृषी सहाय्यक कु.उखलकर तर परिसरातील संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी शेतकऱ्यांना झटका मशीन देणार : ना. राठोड

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

सध्या अनेक भागात मानव आणि वन्यप्राण्यांमध्ये संघर्षाच्या घटना घडत आहेत. अशा घटना रोखण्यासाठी जिल्ह्यातील १६ तालुक्यातील शेतकऱ्यांना बॅटरीवर चालणाऱ्या झटका मशीन देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी शुक्रवारी दिली.

दिग्रसमधील भवानी टेकडी परिसरात अटल आनंदवन घनवन या मियावाकी प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. शेतकऱ्यांना झटका मशीन देण्यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून जिल्हा खनिकर्म योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून ५० कोटींची तरतूद केली आहे. प्रायोगिक तत्वावर पहिल्यांदा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक हजार प्रमाणे १६ हजार लाभार्थींची निवड करुन त्यांना झटका मशीन देण्याचा निर्णय घेतला आहे.



अतिरिक्त अर्जदारांची ईश्वरचिठ्ठीद्वारे निवड करुन त्यांना मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. या झटका मशीनच्या माध्यमातून मानव- वन्यप्राण्यांतील संघर्ष कमी करण्यास मदत होणार आहे. अशाप्रकारची पद्धत चंद्रपूरमध्ये वापरली जात आहे. त्याच धर्तीवर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेंच्या सहाय्याने यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना झटका मशीन देण्यात येणार आहे. वनसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणासाठी नागरिकांनी वन विभागाला सहकार्य केले पाहिजे. वन विभागाच्या उपक्रमांसाठी राज्य शासन सहकार्य करेल, असे पालकमंत्री संजय राठोड यावेळी म्हणाले.

## नवरात्रात डोंगरगाव गव्हा व रुई येथील देवीच्या मंदिरात सोई-सुविधा देण्याची मागणी

**विदर्भ कल्याण / दिग्रस**

खेड्यातील शिक्षण, आरोग्य, पाणी, घरकुल आधी मूलभूत समस्या व योजना वंचित घटकापर्यंत पोचून शासनाचा लाभ घेण्यासाठी निर्माण करण्यात आलेली स्थानिक स्वराज्य जननी म्हणजेच पंचायत समिती इथूनच शासनाच्या सोयी सवलती गाव खेड्यातील जनतेपर्यंत पोहोचविल्या जातात. परंतु मानोरा तालुका हा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर व निसर्गाच्या सानिध्यात वसलेला तालुका आजही येथील जनतेला शासनाच्या अनेक सोयी सवलती पासून वंचित आहे. मानोरा आजही विविध समस्या स्वातंत्र्य काळापासून आ वासून उभ्या आहेत. वाडी वस्ती ना रस्ते पाणी व शाळेला शिक्षक या कळीच्या मुद्द्यावरून येथील प्रशासन सुस्त आहे. या बाबत पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत सदस्या छाया राठोड यांनी सभेत विविध समस्या मांडून शासनाने लक्ष वेधताना कोडोली येथील जिल्हा परिषद शाळेला तातडीने शिक्षकाची नियुक्ती देण्याची मागणी करुनही सदर शाळेला शिक्षक मिळत नसल्याने अखेर सभागृहात याबाबत नाराजी व्यक्त करत तसा ठराव मंजूर करून घेतला. बोरव्हा येथील गावातील मुख्य रस्त्यावरील पुलं खचल्याने त्या पुलांची तात्काळ दुरुस्ती बाबत ठराव घेऊन जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आले.

नवरात्रात उत्सवात तालुक्यातील रुई येथील वाघमाय, डोंगरगाव व गव्हा येथील भवानी मातेच्या मंदिरात भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य व ईतर सोईसुविधा उपलब्ध करून देण्याचे पत्र दिले होते. याबाबत सांख्यिकी अधिकारी गायकवाड यांनी सभागृहात पत्र वाचून दाखवताच सदस्य सचिन घोडे व रेखा पडवाळ यांनी हा मुद्दा लावून धरले तेव्हा तालुका आरोग्य अधिकारी डॉ चाफे यांच्या वतीने दामोदरे यांनी नवरात्रात काळात गव्हा, डोंगरगांव व रुई येथे आरोग्य क्याप लावलें जाईल असे आश्वासन दिले . स्वच्छता व पाण्याची व्यवस्था पंचायत समिती स्तरावर स्थानिक ग्रामपंचायतीच्या वतीने सुविधा उपलब्ध करून देण्याचे गटविकास बयास अधिकारी यांनी सांगितले.तसेच मागील महिन्यात पावसाच्या सततच्या खंडामुळे सोयाबीन पिकावर येल्लो मोझ्याक या रोगामुळे पिकांच्या नुकसानीचे भरपाई संदर्भात पं. स. कृषी विभागाकडून तातडीने कारवाई करण्याची मागणीही छाया राठोड यांनी केली होती. याबाबत पंचायत समिती कृषी विभागाकडून वरिष्ठांकडे पाठपुरावा करून कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

### अन्यथा परिणाम भोगावे लागतील : उपोषणकर्त्यांचा सरकारला इशारा

## सरकारने मराठा आरक्षणाचा विषय गांभीर्याने घ्यावा

**विदर्भ कल्याण / उमरखेड**

मराठा समाजाला आरक्षणाचा मागणीकडे शासनाने गांभीर्याने घ्यावे अशी मागणी उमरखेड येथील उपोषणकर्त्यांनी केली आहे. अन्यथा सरकारला परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला आहे.

सरकारने ७ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेऊन मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची समिती गठित केली. त्या समितीमध्ये पुसद, उमरखेड, महागाव येथील कार्यकर्त्यांचा समावेश आहे. उमरखेड सकल मराठा समाजाच्या



वतीने लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून मागणी करण्यात आली. मात्र सरकार कडून जो आदेश निघाला त्यामध्ये केवळ मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांच्या नोंदीचा अभ्यास करण्याचे जाहीर केले आहे.त्यामध्ये कुठेही उमरखेड महागाव पुसदचा समावेश नाही. या तीन तालुक्यातील मराठा समाज मोठ्या प्रमाणात आक्रमक झाला आहे. या तीन तालुक्यासह अखंड महाराष्ट्रातील सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे असे त्यांनी एक मुखाने मागणी केली. शासनाने ही मागणी पूर्ण न केल्यास येणाऱ्या काळात आमरण उपोषणासह आक्रमक व तीव्र करण्यात येईल हा लढा समाजाच्या अस्तित्वाचा असून "करो या मरो" अशी वेळ समाजावर आल्याची भावना उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली. 14 ऑक्टोंबर रोजी अंतरावली सराटी येथे मराठा समाजाची सभा होणार आहे. या सभेला उमरखेड तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने जाण्याचे आवाहन केले आहे. तालुक्यातून मोठ्या प्रमाणात मराठा समाज आंतरवाली सराटी येथे जाणार आहे. दिनांक 2 ऑक्टोबर पासून सुरू झालेल्या साखळी उपोषणामध्ये तालुक्यातील विविध गावातील लोक सहभागी होत आहे. 14 ऑक्टोबर नंतर मनोज जरांगे पाटील यांच्या सभेचे देखील उमरखेड येथे नियोजन करण्यात येणार आहे. 13 ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे आयोजित शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र जोपर्यंत मराठा आरक्षणाचा ठोस निर्णय घेवून मराठा आरक्षणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत शासनाचा कुठल्याही कार्यक्रम होऊ देणार नसल्याचे उपोषणकर्त्यांनी जाहीर केले. यवतमाळ येथे होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमावर जिल्ह्यातील सकल मराठा समाजाने बहिष्कार, निषेध नोंदवावा असे आवाहन सकल मराठा समाज उमरखेड येथील उपोषणकर्ते सचिन घाडगे, गजानन जाधव, गोपाल कलाने, शरद मगर व शिवाजी पवार यांनी सकल मराठा समाजाला केली आहे.

## शिप नदी पात्रातून रेती तस्करी

**विदर्भ कल्याण / गुंज**

महागाव तालुक्यातील गुंज सर्कल मधुन नाल्याच्या वाळुला सुध्दा रेती तस्कारीची काळी नजर लागली आहे. माळेगाव शिप नदी व नाल्यातून सर्रास रेतीचे उत्खनन करून त्याची ट्रॅक्टर इतर वाहनाद्वारे अवैधरित्या वाहतूक करण्यात येत आहे. त्यामुळे नदी -नाल्यात मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. रात्री, दिवसाकाठी शेकडो ब्रास रेतीची तस्करी करण्यात येत आहे. त्यामुळे शासनाच्या तिजोरीला फटका बसत आहे. अद्याप महसूल प्रशासनाने एकाही वाहनावर कारवाई केली नाही. त्यामुळे कुठेतरी पाणी मुरत असल्याची शंका उपस्थित केल्या जात आहे. या नदी - नाल्यावर अनेक रेती तस्कराची नजर आहे. पंधरा दिवसापूर्वी तालुक्यात जोरदार पाऊस झाल्यामुळे नदी- नाल्यांना पुर् आला होता. सदर पुर ओसरल्या नंतर अनेक नदी -नाल्यांमध्ये रेतीचे साठे निर्माण झाले आहेत. हीच संधी साधून तालुक्यातील माळेगाव, माळकिन्ही, गुंज, हिवरदरी परिसरातील अनेक रेती तस्करांनी या नदी- नाल्यांकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. या नदीतून अवैध रेतीचे उत्खनन करून त्यांची ट्रॅक्टरसह इतर वाहनाने सर्रास वाहतूक केल्या जात आहे.

अवैधरित्या रेतीचे उत्खनन होत असल्यामुळे नदी- नाल्यांमध्ये मोठमोठे खड्डे पडले आहेत. परिणामी भरमसाठ रेती उपशामुळे महसूल खातेचे अतोनात नुकसान होत आहे तरी देखील या गुंज परिसरात शासनाचे दुर्लक्ष होत आहे.

महागाव तालुक्यात अनेक गावात रेती तस्कारावर महसुल खात्याची दमदारपणे धरपकड चालु आहे. मात्र त्यातच नदी- नाल्यातून रात्री बे रात्री, सकाळच्या ३ वाजताच्या सुमारास रेतीची वाहतुक होत आहे. हीच रेती बांधकाम मालकांना अव्वाच्या सव्वा भावात विकून रेती तस्कर आपली तुंबडी भरत आहेत. गौण खनिजाला आळा बसवा, यासाठी तहसिल प्रशासनाने पथकाची निर्मिती केली आहे. परंतु या रेती तस्कराकडे पथक हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे कुठे तरी पाणी मुरत असल्याची शंका निर्माण होत आहे.

१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
विदर्भ कल्याण
यवतमाळ जिल्हा विशेष
मंगळवार,
१० ऑक्टोंबर २०२३

# अंबा नगरीत सुविधांचा अभाव

## अन्यथा ले आउट रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करणार

**विदर्भ कल्याण / पांढरकवडा**

शहरातील अंबा नगरीत सोयी सुविधांचा अभाव आहे. ले आऊट धारकांनी १५ दिवसाचे आत नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून द्यावे, अन्यथा सदर ले आउट रद्द करण्या बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती नगर परिषद प्रशासनाने दिली.

येथील सुशील मुरारीलाल बाजोरिया, सुविधी पन्नालालजी सुराणा , रामजी रघुनाथजी व्यास, रवी बाबुलालजी बाजोरिया व सौ. स्नेहा अनुप सिंघानिया यांच्या मालकीचे गट नं. ४५ क्षेत्र १.६२ हे. आर मध्ये मा. अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे रा.मा.क्र. ६२.३४ २०११-२०१२ दि. ०७/०६/२०१२ अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक आदेश विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून केलेला होता. परंतु दि. ०३/१०/२०२३ रोजी अंबा नागरी मधील प्लाट धारकांनी सदर ले आउट मध्ये सुविधा नसल्या मुळे असंख्य अडचणीला तोंड द्यावे लागत आहे व तसेच आरोग्याच्या समस्या उद्भवत असल्याबाबत या कार्यालयास तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. ०४/१०/२०२३ रोजी नगर परिषद कडून बाधकाम अभियंता, आरोग्य अभियंता व विद्युत अभियंता यांचे मार्फत उक्त ले आउट ची पाहणी केली असता रस्ते, सांडपाणी वाहून जाने करिता नाल्या, विद्युत लाईट, पिण्याचे पाण्याची व्यवस्थापन , ओपन स्पेस यापैकी कोणीही सुविध दिसून आलेली नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात नागरिकाच्या घरात पाणी शिरत आहे. यामुळे सदर ले आऊट मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. खरं तर अकृषक आदेश प्राप्त झाल्यानंतर वरील सोयी सुविधा प्लॉट धारकांना देणे पुरविणे बंधनकारक असताना लेआऊट मालकांनी नागरी सुविधा न करताच प्लॉट विक्री केलेली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. ले आऊट चा विकास न करता प्लॉट ची विक्री करून दिलेली आहे. ही बाब नियमास धरून नाही. ले आऊट पाडणा-यांनी १५ दिवसाचे आत उपरोक्त निर्देशित केल्याप्रमाणे नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून द्यावे, अन्यथा सदर ले आउट रद्द करण्या बाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कडे सादर करण्यात येणार असल्याचे नगर परिषद पांढरकवडाच्या वतीने सांगण्यात आले.

### उपचाराचा खर्च सर्व सामान्यांच्या आवाक्या बाहेर

# उमरखेड तालुक्यात डेंगूचे थैमान

**विदर्भ कल्याण / उमरखेड**




शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात डेंगूच्या रुग्णसंखेत दिवसागणिक वाढ होत आहे. वाढत्या रुग्णसंखेला सार्वजनिक ठिकाणची अस्वच्छताच जबाबदार ठरत असून नगरपालिका नगर पंचायत व ग्रामपंचायती स्वच्छतेच्या बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. नागरिकांच्या जीवितवासी खेळत असल्याचा संताप जनक आरोप आता नागरिकांतून उपस्थित होऊ लागला आहे.

शहरासह ग्रामीण भागात सांडपाणी व्यवस्थापन नाल्यासफाई होत नाही. सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत व ठिकठिकाणी तुंबून असलेले पाणी व केर कचऱ्याची वेळेच्या वेळी विल्हेवाट लावल्या जात नसल्यामुळे सर्वत्र डासांचे साम्राज्य निर्माण झाल्याचे दिसत असून वाढत्या डासांमुळे डेंगू मलेरिया यासारख्या रोगाने थैमान घातल्याचे दिसत आहे. शहरासह गावातील प्रत्येक घरात या आजाराचे रुग्ण असल्याचे आढळून येत असून वाढत्या रुग्णसंखेमुळे सरकारी आरोग्य यंत्रणेची झोप उडाल्याचे दिसत आहे. सरकारी रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांना बेड मिळत नसल्याची ओरड रुग्णांच्या नातेवाईकाकडून केल्या जात आहे. सरकारी रुग्णालयापाठोपाठच खाजगी रुग्णालय देखील रुग्णांनी खचाखच भरल्याचे दिसून येत आहे. खाजगी रुग्णालयात उपचार घेण्याची ऐपत नसताना देखील रुग्णांना नाईलाजाने खाजगी रुग्णालयात दाखल करावे लागत आहे. उपचार खर्चाचा भार उचलताना रुग्णांच्या नातेवाईकांची पूर्ती दमछाक होत असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.

उमरखेड तालुक्यातील सरकारी आरोग्य यंत्रणा या कामी अपुरी पडत असल्याचे वास्तव समोर येत आहे. उमरखेड तालुक्यात सातत्याने डेंगू रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याच्या कारणाचा मागोवा प्रशासकीय यंत्रणेकडून घेतला जात नसल्याची ओरड नागरिकातून मोठ्या प्रमाणात होत. शहर व ग्रामीण भागातील वाढती अस्वच्छता हेच डेंगूच्या रुग्ण संख्येत वाढ होण्याचे एकमेव कारण मानल्या जात असले तरीही प्रशासकीय यंत्रणे कडून स्थानिक नगरपालिका ग्राम पंचायती यांना स्वच्छतेसह डास निर्मूलनासाठी फवारणीसाठी प्रवृत्त करण्याबाबत प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याचे स्थानिक नागरिकांतून बोलल्या जात आहे.

# 'गोदावरी अर्बन'च्या उमरखेड शाखेचा वर्धापन दिन



**विदर्भ कल्याण / उमरखेड**

गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नांदेडच्या उमरखेड शाखेच्या वर्धापन दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सातत्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपल्या सभासदांना, ठेवीदारांना, कर्जदारांना नवं नवीन सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत विविध समाज उपयोगी कार्य करीत असते सध्या संस्थेचे कार्यक्षेत्र सह राज्यात आहे. संस्थेच्या ठेवी 2200 कोटीच्या वर आहे. अध्यक्षा राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या मार्गदर्शनात संस्थेची उल्लेखनीय कामगिरी सुरू आहे. शाखा उमरखेड च्या 7व्या वर्धापन दिनाच्या निमित्याने संस्थेच्या अध्यक्षा पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, मुख्य व्यवस्थापक सुरेखा दवे, वरिष्ठ व्यवस्थापक रवि इंगळे यांच्या मार्गदर्शनात जिल्हा परिषद मध्यामिक कन्या शाळा मधील विद्यार्थिनींना कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कीट वाटप करण्यात आल्या. मुख्याध्यापक पाखरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी शाखा व्यवस्थापक धनंजय क्षीरसागर यांनी गोदावरी अर्बन संस्थेची माहिती दिली. यावेळी उप शाखा व्यवस्थापक राहुल देशमुख, पराग देशपांडे, रितेश गिरी, निखिल शुक्ला व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# मुळावा सरपंच अविश्वास ठराव पारित



**विदर्भ कल्याण / मुळावा**

मुळावा ग्रामपंचायत सरपंच ललिता रामराव जामकर यांच्या विरोधात दाखल झालेला अविश्वास ठराव12-3 अशा फरकाने मंजूर झाल्याची माहिती पिठासीन अधिकारी तथा उमरखेड चे तहसीलदार आनंदजी देऊळगावकर यांनी दिली.

ग्रामपंचायतच्या 15 पैकी 12 सदस्यांनी सरपंचाच्या विरोधात अविश्वास ठरावाची मागणी तहसीलदार देऊळगावकर यांच्याकडे केली होती. त्यानुसार मुळावा ग्रामपंचायत कार्यालय येथे सोमवारी 9 ऑक्टोंबर रोजी विशेष सभा घेवुन मतदान घेण्यात आले. एकूण सर्व 15 सदस्य उपस्थित होते. त्यापैकी 12 सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. तर सरपंच ललिता जामकर यांच्यासह नंदा दिलीप काळे आणि धम्मानंद खडसे या दोन सदस्यांनी मात्र ठरावाच्या विरोधी बाजूने मतदान केले. संजय देशमुख, संजीवनी पत्रे, गणेश खडसे, गजानन पडघनकर, मोहम्मद मेहजवीन, मो. जावेद, शिवशंकर गोरे, सुरज वाडेकर, शारदा जाधव, राजेश जकाते, राधाबाई मोरे, विजयश्री बर्डे या बारा सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. यावेळी तहसीलदार, आनंद देऊंळगावकर, मंडळ अधिकारी यु.ए. जुमडे, तलाठी पंजाब सानप, सचिव धम्मपाल अडागळे, व्हि. बी. बोधगीरे, ग्रामपंचायत कर्मचारी वाघोजी जाधव, डिगांबर मोरे, विजय चव्हान, आशिष पाटील इ . उपस्थीत होते.

# युवकांचा शिवसेना प्रणित युवा सेनेत प्रवेश



**विदर्भ कल्याण / पांढरकवडा**

यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात पांढरकवडा येथील शेकडो युवकांनी पालक मंत्री तथा मृद व जलसंधारन मंत्री ना संजय राठोड यांच्या हस्ते युवासेनेत प्रवेश घेतला. यावेळी संपर्क प्रमुख हरिहर भाऊ लिंगनवार, सह संपर्क प्रमुख राजुदास जाधव, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, पराग पिंगळे, उपजिल्हा प्रमुख डॉ विष्णू उकंडे, युवा सेना जिल्हा प्रमुख आकाश राठोड, तालुका प्रमुख केळापुर जयवंत बंडेवार, तालुका प्रमुख आर्णी राजेंद्र काका जाधव, तालुका प्रमुख घाटंजी निलेश चव्हाण, सुभाष राठोड, युवासेना तालुका प्रमुख शुभम येंचलवार, अजय कुमरे, दुधबुळे ,कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनोहर नाईक उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्याची विभागीय स्तरावर निवड



**विदर्भ कल्याण / दारव्हा**

जिल्हा क्रीडा अधिकारी यवतमाळ द्वारा आयोजित जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत स्थानिक उर्दू हायस्कूलचा विद्यार्थी अहेफाज अहमद अश्फाक अहमद याने जिल्हा स्तरीय कॅरम स्पर्धा जिंकली असून विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे. तत्पूर्वी तालुका स्तरीय स्पर्धेत शाळेची चमू उपविजेती ठरली होती. विद्यार्थी व चमूचे कौतुक करण्यात येत आहे. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य नोमान नबील व क्रीडा शिक्षक मोहम्मद शहेबाज यांना देतात.

# कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याला विरोध

**विदर्भ कल्याण / मारेगाव**



तालुक्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून तेथील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेमध्ये समाविष्ट करण्यात येईल. या शासनाच्या निर्णयाविरोधात मारेगाव तालुका पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार मारेगाव यांना निवेदन देण्यात आले.

कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून त्यांचे केंद्रीय शाळेमध्ये विलीनकरण करणे असा महाराष्ट्र शासनाने नुकताच निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. ग्रामीण भागातील शाळा ओस पडणार आहे. ज्यांचे पोट हातावर आहे अशा गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे. खेडेभागातील गरीब विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहणार आहे.आणि पुन्हा जुण्यासारखीच परिस्थिती पुन्हा उद्धवू शकते. ही समस्या डोळ्यासमोर ठेऊन मारेगाव तालुका पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने याविरोधात मारेगाव तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पत्रकार भास्कर धानफुले, मोरेश्वर ठाकरे, भास्कर राऊत, सुमित गेडाम, सुरेश नाखले, गजानन देवाळकर, धनराज खंडरे, सुमित हेपट, गजानन आसूटकर, शरद खापणे, भैय्याजी कनाके, आनंद नक्षणे, सुरेश पाचभाई, प्रफुल ठाकरे आदी उपस्थित होते.

# बिलायता येथे राणी दुर्गावती जयंती साजरी

**विदर्भ कल्याण / घाटंजी**

बिलायता येथे राणी दुर्गावती मडावी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महाजन शेडमाके, विनोद मडावी, अनिल पेंदोर, गावातील पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बिरसा ब्रिगेडचे दीपक मडावी, रुपेश आडे, रघुनाथ पेंदोर, मारोती आडे, प्रदीप भगत, विष्णू पेंदोर व सर्वच पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

# शोक म्हटल्यावर काय येत आपल्या मनात?

**जागतिक मानसिक आरोग्य दिवस विशेष**

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

जेव्हा शोक किंवा तीव्र दु:ख चा विचार करतो तेव्हा एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूनंतर होणाऱ्या वेदना आणि दु:खाच्या संदर्भात विचार करतो. इतर कोणत्याही प्रकारच्या नुकसानापेक्षा एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूनंतर आपण सर्वांना सामान्यत: वेदना जाणवते. आपल्या ओळखीच्या आणि प्रिय व्यक्तीच्या मृत्यू ही जीवनातील सर्वात तणावपूर्ण घटनांपैकी एक आहे जी गंभीर भावनिक वेदनेस कारणीभूत ठरू शकते. पण एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यू व्यतिरिक्त विविध परिस्थितींमध्ये दु:ख अनुभवले जाऊ शकते. एखाद्या जवळच्या व्यक्तीच्या मृत्यू हे दु:खाचे एक महत्त्वपूर्ण कारण असले तरी ते एकमेव कारण नाही. जरी या प्रकारचा आघात अनुभवल्याने अनेकदा सर्वात जास्त वेदना होते, तरीही कोणत्याही नुकसानामुळे सुद्धा दु:ख होऊ शकते.

शोक आणि तीव्र वेदना या सामान्य भावना आहेत ज्या कोणत्याही मोठ्या नुकसानीनंतर किंवा जीवनातील महत्त्वपूर्ण बदलानंतर अनुभवल्या जाऊ शकतात. नातेसंबंध तुटणे किव्हा गमावणे, जवळची मैत्री तुटणे, नोकरी गमावणे, करिअरमधील अडथळे अनुभवणे किंवा परिपूर्ण व्यवसायातून निवृत्त होणे, यामुळे ओळख, उद्देश, आर्थिक सुरक्षितता आणि कामाशी संबंधित सामाजिक संबंध गमावणे, गर्भपात, वया मुले आरोग्य खराब होणे किंवा क्षमता कमी होणे, पाळीव प्राण्याचे नुकसान, स्वप्न किंवा अपेक्षा तुटणे. या सर्व गोष्टींचा शोक होऊ शकतो. शोक दरम्यान, आपल्याला तीव्र भावना आणि त्या दु:खासोबत असलेले दुसरे विचार अनुभवतात. यात अपराधीपणाची भावना, राग, खेद आणि आराम यांचा समावेश असू शकतो. भावना आणि विचारांचे हे अतिरिक्त स्तर दु:खाची प्रक्रिया गुंतागुंतीत करू शकतात. या गुंतागुंतीच्या भावना आणि विचारांनाचा सामना करण्यासाठी खालील दिलेल्या काही टिप्स चा अनुसरण करू शकतो.

१. स्वत:ला दु:ख अनुभवण्याची आणि आपल्या भावना व्यक्त करण्याची परवानगी द्या. रडणे, दु:खी होणे किंवा राग व्यक्त करण्या मध्ये काही हैर नाही . आपल्या स्वत: च्या मार्गाने आणि आपल्या स्वत: च्या गतीने शोक व्यक्त होण्या साठी स्वत: ला जागा द्या.

२. कोणाची मदद घ्या: विश्वासू मित्र मैत्रीण, कुटुंबातील सदस्य किंवा समर्थन गटांपर्यंत पोहोचा जे सांत्वन आणि समज देऊ शकतात. अशाच प्रकारचे नुकसान अनुभवलेल्या इतरांसोबत आपल्या भावना व्यक्त केल्याने आपल्याला एकटेपणा कमी वाटण्यास आणि मौल्यवान समर्थन प्रदान करण्यात मदत होऊ शकते.

३. स्वत:ची काळजी घ्या: दु:ख शारीरिक आणि भावनिक दोन्ही वाटू शकते, म्हणून स्वत: ची काळजी घेण्यास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि झोपेचे नियमित वेळापत्रक ठेवणे. आपल्याला आराम आणि सांत्वन मिळवून देणाऱ्या क्रियाकलापांमध्येठरू शकतात.

४. धीर धरा: दु:ख ही एक प्रक्रिया आहे ज्यासाठी वेळ लागतो आणि उपचारासाठी कोणतीही निश्चित वेळ नाही. स्वत:शी धीर धरा आणि तुमचे दु:ख लवकर दूर करण्यासाठी स्वत:वर दबाव टाकणे टाळा. स्वत: ला दु:ख व्यक्त करू द्या आणि आपल्या गती ने बरे होऊ द्या.

५. आनंदाचे क्षण आले तरी येऊ देत: स्वत:ला दु:ख होऊ देणे महत्त्वाचे असले तरी, विश्रांती आणि आनंदाचे क्षण देणाऱ्या क्रियाकलापांमध्ये व्यस्त राहणे देखील उपयुक्त ठरू शकते. छंदांमध्ये गुंतणे, निसर्गात वेळ घालवणे किंवा तुम्हाला आनंद देणाऱ्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होणे यामुळे दु:खापासून तात्पुरती सुटका होऊ शकते. आपण हे लक्षात ठेवणे गर्जे चे आहे कि प्रत्येकाचा दु:खाचा प्रवास वेगळा असतो आणि या टिप्स प्रत्येक व्यक्तीला किंवा परिस्थितीला लागू होत नाहीत. आपण आपली वैयक्तिक दु:ख प्रक्रिया नेव्हिगेट करत असताना स्वत:वर विश्वास ठेवणे महत्वाचे असते. आवश्यक असल्यास समुपदेशकाची मदत घ्या: जर तुम्हाला असे वाटत आहे कि तुमचे दु:ख तुमच्या दैनिक कार्य करण्याच्या तुमच्या क्षमतेमध्ये हस्तक्षेप करत आहे, तर प्रशिक्षित समुपदेशकांशी बोलून मदत घेण्याचा विचार करा. एक थेरपिस्ट किंवा समुपदेशक तुमच्या दु:खाला समजून घेऊन मार्गदर्शन आणि समर्थन देऊ शकतात.

मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाइन प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांद्वारे मोफत समुपदेशन प्रदान करते. हेल्पलाईन चे समुपदेशक करिअर, मैत्रीचा ताण, नातेसंबंध, कौटुंबिक आणि सामाजिक दबाव, कामाच्या जीवनातील तणाव, नुकसानाची चिंता, दारू किंवा इतर पदार्थांचे सेवन, घरगुती किंवा लैंगिक अत्याचार, कोणत्याही प्रकारची हिंसा, तीव्र भावना, नुकसान आणि दु:ख, आत्महत्येची विचारसरणी, गंभीर मानसिक आरोग्य संघर्ष हाताळण्यासाठी प्रशिक्षित आहे.

***तुम्ही आम्हाला सोमवार ते शनिवार दुपारी १२ ते रात्री ८ या वेळेत कॉल करू शकता. येथे तुम्ही हिंदी, मराठी आणि इंग्रजी मध्ये चर्चा करू शकता. हेल्पलाइन नंबर आहे - 788-788-9882***

# नगरपालिकेचे दुर्लक्ष : दूषित पाणी पुरवठा

**विदर्भ कल्याण / वणी**



मागील काही दिवसांपासून वणी शहरात नियमित दूषित पाणीपुरवठा होत आहे. यासंदर्भात युवासेनेने नगर परिषदेच्यामुख्याधिकाऱ्यांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी निवेदन दिले.

शहरातील अनेक भागांत गेल्या महिन्याभरापासून दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. मानवी आरोग्य धोक्यात येत या अनुषंगाने अनेक प्रभागांतील नागरिकांनी याबाबत नगर परिषद येथे तोंडी तसेच लेखी तक्रार दिली आहे. तरीदेखील अजूनही अनेक प्रभागांत दूषित पाणीपुरवठा होत आहे. याबाबत आंदोलन करण्याचा विचार केला जात आहे.दूषित पाणीपुरवठा होणाऱ्या भागांमध्ये आशीर्वाद बार जवळचा परिसर, विठ्ठलवाडी, पट्टाचारा नगर, प्रगती नगर, गुरूनगर, कनकवाडी, शास्त्रीनगर, सेवानगर, माळीपूरा ही प्रमुख स्थळे आहेत. यातील अनेक भागांत नाल्यांच्या कामामुळे पाईपलाईन फुटल्याची कारणे देण्यात येत आहेत. यावर्षीपासून नगर परिषदेने पाणीकरात वार्षिक 600 रुपयांची वाढ केली आहे. ही वाढ केल्यानंतरही नगर परिषदेकडून दूषित पाणी वणीकरांना पुरविले जात आहे. सध्या संपूर्ण जिल्यात डेंगूने थैमान घातले आहे. तापाची साथ सुरू आहे. रुग्णालयं रुग्णांनी भरली आहेत. अशातच नगर परिषदचे फॉगिंगकडे दुर्लक्ष आहे. अनेक परिसरात फॉगिंग केलेले नाही. जिल्ह्यातून साथ तालुक्यात येण्यास वेळ लागणार नाही. परिस्थिती आवाक्याबाहेर गेल्यानंतर नगर परिषदेला अनेक परिसरात फॉगिंग केलेले नाही. जिल्ह्यातून साथ तालुक्यात येण्यास वेळ लागणार नाही. परिस्थिती आवाक्याबाहेर गेल्यानंतर नगर परिषदेला जाग येणार आहे काय? नगर परिषदेला जर जाग येत नसल्यास युवासेना आपल्या आंदोलनाने जाग आणण्यास तयार आहे. असा दम युवासेनेकडून निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी युवासेना उपजिल्हा प्रमुख अजिंक्य शेंडेंसह कार्यकर्ते व प्रभागातील महिला उपस्थित होत्या.

१ २ ३ ४ ५ ६